# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र

**जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रुम नं.१,२,५ व ६,**

**हजारीमल सोमाणी मार्ग, सि.एस.टी.स्टेशन समोर, मुंबई-४०० ००१**

**०२२-२२०५ ७४०९/ २२०७ २०९७/ २२०१ ८५३९ (फॅक्स) E-mail : *mah-sforum@nic.in***


क्र.राआ/महा./आस्था-३/ब व प/अध्यक्ष जि.मं./२०१५/७०९३ दिनांकः-२७/१०/२०१५

**वाचा** :- १) ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ व त्याखालील नियम

२) जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या पूर्णवेळ अध्यक्ष व सदस्य गट-अ (सेवाप्रवेश) नियम, २०११

३) या कार्यालयाचे कार्यालयीन आदेश क्र.

अ) राआ/महा./आस्था/नि व प /अध्यक्ष जि.मं./२०१३/२१९५ , दि.२५.०६.२०१३

ब) राआ/महा./आस्था-३/ब व प/अध्यक्ष जि.मं./२०१४/६९९२ दि. २९.१०.२०१५

## -ः <u>कार्यालयीन आदेश</u> ः-

वरील क्र.३ अ) व ब) वर दर्शविलेल्या कार्यालयीन आदेशान्वये श्रीमती स्नेहा स. म्हात्रे, श्री.मनोहर यशवंतराव मानकर व श्री.अंबादास झायबुजी तेलगोटे यांची अनुक्रमे अतिरिक्त ठाणे, ठाणे, व मुंबई उपनगर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या अध्यक्षपदांवर पदस्थापना करण्यात आलेली होती.

प्रशासकीय निकड लक्षात घेऊन ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ व त्याखालील नियम तसेच जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या पूर्णवेळ अध्यक्ष व सदस्य गट-अ (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील तरतुदींस अनुसरुन वरील मा.अध्यक्षांची खाली दर्शविल्याप्रमाणे बदलीने त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या अध्यक्षपदावर पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ. क्र. | मा.अध्यक्षांचे नांव | सध्याची पदस्थापना | बदलीनंतरची पदस्थापना | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | श्रीमती स्नेहा स. म्हात्रे | अतिरिक्त ठाणे जिल्हा मंच | ठाणे जिल्हा मंच | प्रशासकीय कारणास्तव **(श्री. मानकर यांच्या जागी)** |
| २. | श्री.मनोहर यशवंतराव मानकर | ठाणे जिल्हा मंच | मुंबई उपनगर जिल्हा मंच | विनंतीने **(श्री. तेलगोटे यांच्या जागी)** |
| ३. | श्री.अंबादास झायबुजी तेलगोटे | मुंबई उपनगर जिल्हा मंच | अतिरिक्त ठाणे जिल्हा मंच | विनंतीने **(श्रीमती स्नेहा म्हात्रे यांच्या जागी)** |

हे आदेश मा.अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र यांचे पूर्वमान्यतेने निर्गमित करण्यात येत असून दिनांक १ नोव्हेंबर, २०१५ पासून अंमलात येतील.

31/10/15
(विलास प. पवार)
प्रभारी प्रबंधक प्रशासन,
राज्य आयोग, महाराष्ट्र, मुंबई

प्रति,
१) श्रीमती स्ने. स. म्हात्रे, मा.अध्यक्ष, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, अतिरिक्त ठाणे
२) श्री.मनोहर यशवंतराव मानकर, मा.अध्यक्ष, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, ठाणे
३) श्री.अंबादास झायबुजी तेलगोटे, मा.अध्यक्ष, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, मुंबई उपनगर

**प्रतिलिपी** ः

१) मा.श्री.धनराज खामतकर, सदस्य, राज्य आयोग, महाराष्ट्र तथा पालक सदस्य, जिल्हा मंच, मुंबई उपनगर
२) मा.श्री.प्र.बा.जोशी, न्यायिक सदस्य, राज्य आयोग, महाराष्ट्र तथा पालक सदस्य, जिल्हा मंच, ठाणे व अतिरिक्त ठाणे
३) मा.सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४) मा.सदस्य व मा.सदस्या, जिल्हा मंच, अतिरिक्त ठाणे, ठाणे, मुंबई उपनगर
५) प्रबंधक विधी, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई तसेच नागपूर व औरंगाबाद परिक्रमा खंडपीठ
६) प्रबंधक, जिल्हा मंच, ठाणे, अतिरिक्त ठाणे मुंबई उपनगर व यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव
७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (मार्फत प्रबंधक, जिल्हा मंच, मुंबई उपनगर)
८) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे व अतिरिक्त ठाणे (मार्फत प्रबंधक संबंधित जिल्हा मंच)